# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०२३

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**सोमवार, दिनांक १३ मार्च, २०२३ / फाल्गुन २२, १९४४ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **महसूल, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **वने, सांस्कृतिक कार्ये, मत्स्यव्यवसाय मंत्री** | |
| **(३)** | **रोजगार हमी योजना, फलोत्पादन मंत्री** | |
| **(४)** | **कृषी मंत्री** | |
| **(५)** | **सहकार, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** | |
| **(६)** | **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - २३**

---

### वरवेली (ता.गुहागर, जि.रत्नागिरी) गावातील घरांना व विहिरींच्या बांधकामाला तडे गेल्याबाबत

**(१) * ६१६५८ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंजनवेल (ता.गुहागर, जि.रत्नागिरी) येथील समुद्रामध्ये एलएनजी जेटीच्या संरक्षणासाठी संरक्षक भिंत उभारली जात असून त्यासाठी मौजे वरवेली येथील खाणीवर दिवसरात्र दगड उत्खननाचे काम सुरू असून त्यासाठी लावण्यात येणाऱ्या सुरुंगांमुळे गावातील ९० घरांना तसेच विहिरींच्या बांधकामाला तडे गेले असून तसेच सततच्या वाहतुकीमुळे गावातून जाणाऱ्या रस्त्यांची दुरवस्था झाल्याचे माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दगड उत्खननाचे काम नियमानुसार व शासनाच्या परवानगीने करण्यात येत आहे काय, तसेच कोणत्या कंपनीद्वारे करण्यात येत आहे,

(३) असल्यास, उक्त प्रश्न भाग (१) अनुसार कार्यवाही करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी व ग्रामस्थ यांनी संबंधित अधिकाऱ्यांकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२), (३), (४) व (५) मौजे अंजनवेल, ता. गुहागर, जि. रत्नागिरी येथील समुद्रामध्ये कोकण एलएनजी मार्फत ब्रेक वॉटर च्या कामाकरीता संरक्षक भिंत उभारली जात आहे. मौजे वरवेली ता.गुहागर येथील ग.नं. १९८५/३ व १९८७ मधील एकुण क्षेत्र ०४.८५ हे. आर क्षेत्रावर महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ मधील तरतुदीनुसार संबंधितास खाणपट्टा मंजूर करण्यात आला

आहे. सदर खाणपट्टाधारक यांचेकडून मे.एल ॲड टी कंपनी दगडाची खरेदी करून सदर दगड हे ब्रेक वॉटर बनविण्याच्या कामाकरीता वापर करत आहे.

उत्खननासाठी मोठ्या प्रमाणात सुरूंग लावल्याने मोठ्या प्रमाणात काम चालू असल्याने येथील ग्रामस्थांच्या घरांच्या बांधकामांना व इतर बांधकामांना मोठ्या प्रमाणात तडे गेलेले आहेत. तसेच, शेतकऱ्यांच्या विहिरी, बोअरवेल यांचे सुरूंगामुळे पाणी कमी होणे, आंबा, काजू बागायतदार यांचे धुळीमुळे नुकसान होणे, ध्वनी प्रदूषण इत्यादी अनेक कारणांमुळे ग्रामस्थ शेतकरी त्रस्त झालेले असून लोकांचा आक्रोश वाढत आहे. परिणामी खाणमालक यांना कळवून सुध्दा कोणतीही त्वरीत ठोस अंमलबजावणी न झाल्याने दिनांक १५.०२.२०२३ रोजी सकाळी ठीक १०.०० वा. मौजे वरवेली गावातील सर्व ग्रामस्थ सदर उत्खनन ठिकाणी आंदोलन करणेसाठी पाटपन्हाळे मुख्य रस्ता ते उत्खनन या ठिकाणी आंदोलन करणार आहेत. तरी आपणाकडून योग्य सहकार्य व परवानगी मिळण्याची विनंती सरपंच यांनी उपविभागीय अधिकारी, चिपळूण यांना केली आहे.

खाणकाम सुरू असलेल्या परिसरातील विहिरींना तडे गेले आहेत किंवा कसे याबाबत वरिष्ठ भूवैज्ञानिक भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा, रत्नागिरी यांचे मार्फत दिनांक २४.०२.२०२३ रोजी सरपंच, उपसरपंच, मंडळ अधिकारी, ग्रामसेवक व ग्रामस्थ यांच्या समवेत सर्वेक्षण करण्यात आले असून उत्खननामुळे परिसरातील भूजलावर परिणाम झाल्याचे दिसून आले नाही असे अहवालात नमूद केले आहे.

तसेच गावातील ९० घरे तसेच विहिरींच्या बांधकामाला गेलेल्या तड्याबाबत अपर जिल्हाधिकारी कार्यालयाने तहसीलदार यांना याबाबत स्थापत्य अभियंता यांचेकडून तपासणी करणेच्या सूचना दिल्या आहेत.

-----------------

**नरपड (ता.डहाणू, जि.पालघर) येथील समुद्रकिनाऱ्यावरुन अवैध वाळू उत्खनन होत असल्याबाबत**

**(२)** * **५९४२१ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नरपड (ता.डहाणू, जि.पालघर) येथील समुद्र किनाऱ्यावरुन वाळू माफिया अवैध वाळू उत्खनन करुन अनधिकृत मार्गाने वाळूची वाहतुक करीत असल्याचे दिनांक ११ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाची परवानगी न घेता करण्यात येणाऱ्या सदर बेकायदा वाळू उपशांमुळे शासनाच्या महसुलाचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने बेकायदा वाळू उत्खननावर नियंत्रण मिळविण्याकरिता व वाळू माफीयांवर कारवाई करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२), (३) व (४) मौजे नरपड (ता.डहाणू जि.पालघर) येथे दिनांक ०९/०१/२०२३ अनधिकृत १/२ ब्रास रेती वाहतूक करताना आढ़ळून आलेल्या वाहन मालकाकडून रक्कम रुपये १,२४,९९८/- एवढ्या दंडांची वसूली करुन रक्कम शासन जमा केली आहे.

डहाणू तालुक्यात गौण खनिजाचे अवैध उत्खननास व वाहतूकीस आळा घालण्यासाठी ग्रामदक्षता समिती, महसूल अधिकारी व कर्मचारी यांची पथके तसेच, महसूल, परिवहन व पोलीस यांच्या संयुक्त पथकामार्फत वेळोवेळी कारवाया करण्यात येतात. तसेच, समुद्र किनारी गौण खनिज उत्खनन व वाहतूक करण्यास वाहने जाणार नाहीत यासाठी जोड रत्यांवर JCB च्या सहायाने ५ फुट खोल चरी/खड्डे खोदून प्रतिबंधात्मक

उपाययोजना करण्यात आलेली आहे.

डहाणू तालुक्यात सन २०२१-२०२२ व २०२२-२०२३ मध्ये अनाधिकृत गौण खनिज वाहतुक करणाऱ्या ३४ वाहनांवर दंडात्मक कारवाई करुन रक्कम रुपये ४४,३१,६९०/- एवढी दंडात्मक रक्कम वसुल करुन शासन जमा केली आहे.

-----------------

**राज्यातील शासकीय पशुवैद्यकीय सेवांसाठी आकारल्या जाणाऱ्या सेवाशुल्कात केलेल्या वाढीबाबत**

**(३) * ५९०८४ श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय पशुवैद्यकीय दवाखान्यात पशुवैद्यकीय अधिकारी यांची कमतरता असून पशुवैद्यकीय सेवा शुल्कात वाढ केल्याने गोरगरीब शेतकऱ्यांना आर्थिक भूर्दंड पडत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पशुवैद्यकीय सेवा दरात वाढ करण्याची कारणे काय आहेत, यासंदर्भांत चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने दर कमी करण्यासंदर्भांत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) व (२) सद्यस्थितीत राज्यात पशुवैद्यकीय दवाखान्यातील पशुधन विकास अधिकारी, सहायक पशुधन विकास अधिकारी/पशुधन पर्यवेक्षक संवर्गातील मंजूर पदांपैकी नियमित व कंत्राटी पद्धतीने भरलेली व रिक्त पदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे-

| संवर्ग | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|
| पशुधन विकास अधिकारी | २१९५ | १८७८ | ३१७ |
| सहा. पशुधन विकास अधिकारी / पशुधन पर्यवेक्षक (राज्यस्तर) | १०५० | ७९९ | २५१ |
| सहा. पशुधन विकास अधिकारी / पशुधन पर्यवेक्षक (स्थानिक स्तर) | ३५३४ | ३०५९ | ४७५ |

उक्त रिक्त पदांचा अतिरीक्त कार्यभार नजिकच्या पशुवैद्यकीय संस्थांमधील अधिकाऱ्यांकडे सोपविण्यात आलेला असून पशुपालकांना नियमितपणे पशुवैद्यकीय सेवा पुरविण्यात येत आहेत.

पशुवैद्यकीय दवाखान्यामधून देण्यात येणाऱ्या विविध पशुवैद्यकीय सेवांचे दर हे सन २००० मध्ये निश्चित करण्यात आले होते. तद्नंतर कालपरत्वे रुग्ण पशुंवर उपचार करण्यासाठी आवश्यक विविध औषधींच्या किंमती तसेच, आधुनिक उपकरणांचा वापर इ. च्या किंमतीत वाढ झालेली असल्याने पशुवैद्यकीय सेवांसाठी आकारल्या जाणाऱ्या सेवाशुल्कात सुमारे २२ वर्षांनतर शासन निर्णय दिनांक २३/०५/२०२२ अन्वये वित्त विभागाच्या मान्यतेने वाढ करण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेंतर्गत शासनाने मजुरांची डिजिटल उपस्थिती अनिवार्य केल्याबाबत

**(४) * ६१५०७ डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेंतर्गत शासनाने दिनांक १ जानेवारी, २०२३ पासून मजुरांची डिजिटल उपस्थिती अनिवार्य केली असून मोबाईल ॲपवर मजुरांचे फोटो दिवसातून दोनदा अपलोड केले तरच मजुरांना मजुरी मिळणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील रोजगार हमी योजनेच्या कामांवरील मजुरांची उपस्थिती नोंदविण्यासाठी ग्रामरोजगार सेवकांकडून एनएमएमएस (नॅशनल मोबाईल मॉनिटरिंग सिस्टीम) प्रणालीद्वारे दिवसातून दोनदा जिओ टॅग करुन मोबाईलवर कार्यस्थळाचा फोटो घेऊन मजुरांचे हजेरीपट भरण्याच्या जाचक अटींमुळे ग्रामरोजगार सेवकांकडून दिनांक ९ जानेवारी, २०२३ रोजी कामबंद व २४ जानेवारी, २०२३ पासून असहकार आंदोलन व दिनांक १ फेब्रुवारी, २०२३ पासून बेमुदत संप सुरू आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ग्रामरोजगार सेवकांकडे मोबाईल व इतर साहित्य न देता, ग्रामीण भागांत नेटवर्कची समस्या, बहुतांश ठिकाणी मोबाईल ॲप न चालणे तसेच एका ग्रामरोजगार सेवकाकडे रोहयोचे रस्ते, रोपवाटिका, सार्वजनिक विहीर, वृक्ष लागवड अशी अनेक कामे चार ते आठ किमी अंतराच्या परिसरात सुरु असल्याने विहित वेळेत वरील कामांना भेटी देऊन मोबाईल ॲपवर मजुरांचे फोटो घेणे शक्य होत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मजूरांची उपस्थिती नोंदविण्यासंदर्भातील जाचक अटींमुळे तसेच ग्रामरोजगार सेवकांच्या संपामुळे मजुरांवर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, ग्रामरोजगार सेवकांना पूर्ण वेळ सेवकांचा दर्जा दिल्याशिवाय मजुरांची डिजिटल हजेरी घेणार नसल्याचा निर्णय ग्रामरोजगार सेवकांनी घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही. नरेगा सॉफ्ट प्रणालीवर पडताळणी केली असता माहे जानेवारी २०२३ मध्ये पूर्ण महाराष्ट्र राज्यात एकुण ४५१०५ मस्टर नोंदविले आहे.

(३) व (४) हे खरे नाही.

NMMS ॲपमध्ये इंटरनेट उपलब्ध असलेल्या ठिकाणी एकदा मस्टर डाऊनलोड केल्यानंतर कामाच्या ठिकाणी सकाळी हजेरी लावून फोटो घेणे व दुपारी फोटो घेवून डाटा Save करून घेणे त्यानंतर नेटवर्क असलेल्या ठिकाणी येवून अपलोड करण्याची सुविधा आहे. सर्व जिल्ह्यांतील ग्रामरोजगार सेवकांचे माहे डिसेंबर २०२२ पर्यंतचे मानधन अदा करण्यात आलेले आहे.

(५) असे निवेदन शासनास प्राप्त झालेले असून जानेवारी महिन्यात ४५१०५ व फेब्रुवारी महिन्याच्या पहिल्या पंधरवाड्यामध्ये ४११४७ Digital NMMS मस्टर प्राप्त झाले व त्याद्वारे हजेरी प्राप्त करण्यात आलेली आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सोलापूर जिल्ह्यातील विविध तालुक्यांमध्ये दस्त नोंदणी प्रकरणे प्रलंबित असल्याबाबत

**(५) * ५७१७३ श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.विजयकुमार देशमुख (सोलापूर शहर उत्तर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील विविध तालुक्यांमध्ये एकूण ३०७० दस्त नोंदणी प्रकरणे मागील तीन महिन्यांपासून प्रलंबित असल्याचे दिनांक ११ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर दस्त नोंदणीसाठी आल्यानंतर त्यावर विहित मुदतीत पुढील प्रक्रिया होणे शासनाने बंधनकारक केले असताना देखील संबंधित तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांकडून सर्वसामान्य शेतकऱ्यांची अडवणूक करून दस्त नोंदणी वेळेत करत नसल्याने सातत्याने होणाऱ्या खरेदी विक्रीच्या व्यवहारांमुळे नोंदणीसाठी रोज नवनवीन प्रकरणे येत असून प्रलंबित प्रकरणांची संख्या दिवसेदिंवस वाढत असल्याचेही निदर्शनास आले असून याबाबतची तक्रार स्थानिक शेतकरी व लोकप्रतिनिधींनी वरिष्ठांकडे करून देखील कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शेतकऱ्यांच्या वेळेवर नोंदी न लागल्यामुळे त्यांना बँक कर्ज प्रकरणे, शासकीय अनुदान तसेच शासकीय योजनांचा लाभ घेता येत नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२) (३) व (४) हे खरे नाही.

राष्ट्रीय भूमि अभिलेख आधुनिकीकरण कार्यक्रमांतर्गत विकसित ई-फेरफार डॅशबोर्डनुसार दिनांक ११.०१.२०२३ रोजी मंडळ अधिकारी स्तरावर एकूण ३९७५ इतक्या फेरफार नोंदी प्रलंबित असून, त्यापैकी ३३५० इतक्या नोंदी १५ दिवसांतील असून उर्वरित ६२५ इतक्या नोंदी १५ दिवसांवरील आहेत. तसेच तलाठी स्तरावर एकूण ३१४२ इतक्या फेरफार नोंदी प्रलंबित असून, त्यापैकी २१६४ इतक्या नोंदी १५ दिवसांतील असून उर्वरित ९७८ इतक्या नोंदी १५ दिवसांवरील आहेत.

महसूल व वन विभाग, शासन परिपत्रक क्र.राभूअ-२०१९/प्र.क्र.३९/ल-१, दिनांक ०४.०७.२०१९ अन्वये राज्यात सुरू असलेल्या ई-फेरफार प्रणालीच्या अंमलबजावणीसाठी अचूक ७/१२ व ८अ जनतेला ऑनलाईन पध्दतीने उपलब्ध करून देणेकामी महसूल अधिकारी यांच्या जबाबदाऱ्या निश्चित केलेल्या आहेत. त्यानुसार ई फेरफार प्रणालीतील सर्व ऑनलाईन फेरफार नियमाप्रमाणे वेळेत निर्गत करणे तसेच एकही ऑनलाईन फेरफार नोंद एक महिन्यांपेक्षा जास्त व ऑनलाईन तक्रार नोंद तीन महिन्यांपेक्षा जास्त कालावधीसाठी प्रलंबित राहणार नाही याची दक्षता मंडळ अधिकारी यांच्याकडून घेण्यात येत आहे. तसेच ई फेरफार प्रणालीअंतर्गत संबंधित सर्व महसूल नायब तहसिलदार व मंडळ अधिकारी यांचा प्रलंबित फेरफार निर्गतीबाबतचा साप्ताहिक आढावा दर आठवड्याच्या शुक्रवारी व्हीडीओ कॉन्फरन्सद्वारे (VC) घेतला जातो.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पेण (जि.रायगड) तालुक्यातील मे.मुंबई एस.ई.झेड लि. कंपनीने प्रकल्पाकरीता संपादित केलेल्या शेतजमिनी शेतकऱ्यांना परत करण्याबाबत

**(६) * ६११९२६ श्री.रविशेठ पाटील (पेण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेण (जि.रायगड) येथील खारेपाट विभागातील महसूली गावातील मे.मुंबई एस.ई.झेड लि. या कंपनीने प्रकल्पाकरीता संपादित व खरेदीखताने नावे केलेल्या शेतजमिनी प्रकल्प अनेक वर्षांपासून सुरू न झाल्यामुळे परत देण्याबाबत स्थानिक शेतकऱ्यांनी दिनांक १ जून, २०१६ व दिनांक १७ डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान तत्कालीन महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य तसेच दिनांक १२ फेब्रुवारी, २०२० रोजी वा त्यादरम्यान मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे स्थानिक लोकप्रतिनिधींनी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू शेतजमिनी शेतकऱ्यांच्याच ताब्यात असून ७/१२ मात्र कंपनीच्या नावे आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मे.मुंबई एस.ई.झेड लि.प्रकल्प सुरु न झाल्यामुळे जमीनींचे हस्तांतरण भूसंपादन अधिनियम १८९४ चे कलम ११ क व ४१ अन्वये रद्द करून मे.मुंबई विशेष आर्थिक क्षेत्र लि.कंपनीच्या नावाची कब्जेदार म्हणून झालेली नोंद रद्द करून शेतकऱ्यांच्या नावे ही जमीन पूर्ववत करून देण्याबाबत शासनाकडून अद्यापही निर्णय घेण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) रायगड जिल्हयातील पेण तालुक्यातील खारेपाटासह उरण व पेण तालुक्यात एस.ई.झेड प्रकल्पासाठी मे. मुंबई एस.ई.झेड लि. या कंपनीने शेतजमीन खरेदी/संपादित केलेली आहे. सदर प्रकल्प अनेक वर्षांपासून सुरू न झाल्यामुळे शेतजमीन परत देण्याबाबत जिल्हाधिकारी व उपविभागीय अधिकारी यांचेकडे खालील व्यक्ती व संस्थांची निवेदने प्राप्त झालेली आहेत:-

१. मुलभूत अधिकार संघर्ष समिती (MASS), यांचे दि.२२.१२.२०२० रोजीचे निवेदन.

२. प्रकल्पग्रस्त शेतकरी सामाजिक विकास संस्था, यांचे दि.१६.०२.२०२१ रोजीचे निवेदन.

३. सौ.नंदा राजेंद्र म्हात्रे, कोकण विभागीय समन्वय महाराष्ट्र काँग्रेस कमीटी यांचे दि.२२.१२.२०२० रोजीचे निवेदन.

४. २४ गाव सेझ विरोधी शेतकरी संयुक्त कृती समिती, यांचे दि.०३.०६.२०२२ रोजीचे निवेदन.

५. श्री.दत्तात्रेय नवाळे यांनी महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ चे कलम ६३एक-अ नुसार खरेदी केलेल्या जमिनी मुळ शेतकऱ्यांना परत मिळेणबाबत माहे जानेवारी २०२२ मध्ये अर्ज सादर केला आहे.

(२) पेण तालुक्यामध्ये १०९६-०९-८४ हे.आर उरण तालुक्यामध्ये ५७९-०५-५२ हे.आर व पनवेल तालुक्यामध्ये ८-४७-१ हे.आर अशी एकूण १६८३-६२-४६ हे.आर जमीन कंपनीचे नांवे दाखल आहे.

उपविभागीय अधिकारी, पेण यांनी सादर केलेल्या अहवालानुसार यातील काही जमिनी पडीक आहेत तर काही जमिनींवर शेतकऱ्यांची लागवड आहे.

(३) व (४) एसईझेड प्रकल्प सुरु न झाल्यामुळे प्रस्तुत प्रकरणी उरण, पेण व पनवेल या तालुक्यामधील मे.मुंबई इंटिग्रेटेड सेझ लि. या कंपनीने खरेदी केलेल्या जमिनीचे बाबतीत संबंधित शेतकऱ्यांनी अपर जिल्हाधिकारी, रायगड यांचेकडे महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ चे कलम ६३ एक-अ अन्वये वेळोवेळी टप्या टप्याने ५२३ दावे दाखल केले आहेत.

सदर ५२३ दाव्यांमध्ये एकूण २२ वेळा सुनावणी आयोजित करुन दि.१५.०२.२०२३ रोजी सुनावणी प्रक्रिया पुर्ण करण्यात आली आहे.

सदर ५२३ दाव्यांपैकी विकास आयुक्त, उद्योग यांच्या परवानगीने खरेदी केलेल्या जमिनीबाबत ३ दावे दाखल असून त्यापैकी २ दाव्यातील जमिनीची खरेदी ही सन २०१० व १ दाव्यातील जमिनीची खरेदी सन २००६ मध्ये झालेली आहे. उर्वरीत ५२० दाव्यापैकी भुसंपादन संमती निवाडयाद्वारे हस्तांतरीत झालेल्या जमिनीचे दावे ५०८ (क्षेत्र ३०१-२९-४० हे.आर) इतके व जिल्हाधिकारी, रायगड यांचे दि.३०.११.२००६ च्या परवानगीने खरेदी झालेल्या जमिनीचे दावे १२ (क्षेत्र ७-४९-१० हे.आर) इतके आहेत. उर्वरीत ५२० दाव्यामधील जमिनीचे हस्तांतरणाला पंधरा वर्षाचा कालावधी झालेला नाही.

तथापि, भूसंपादन कायद्यातील तरतुदी, महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ मधील तरतुदी तसेच पुनर्वसन अधिनियमामधील तरतुदी नुसार राज्य शासनाकडे जिल्हाधिकारी, रायगड यांचेकडून सविस्तर अहवाल सादर करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सोनके (ता.कोरेगाव, जि.सातारा) येथे महाराष्ट्र ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेचे तत्कालीन चेअरमन व संचालक मंडळाने केलेला गैरव्यवहार

**(७) * ६२१२१ श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोनके (ता.कोरेगाव, जि.सातारा) येथे महाराष्ट्र ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्यादित यांचे तत्कालीन चेअरमन व संचालक मंडळाने बेकायदेशीरपणे अनेकांच्या नावांवर जवळपास रुपये नऊ कोटी बोगस कर्ज प्रकरणे करुन कोट्यवधी रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार केल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर संस्थेमधून सभासद व ठेवीदार यांना त्यांनी ठेवलेले पैसे मिळत नसल्याने त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करुन कारवाई करण्यास दिरंगाई करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी संबंधितांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन ठेवीदारांचे पैसे परत मिळण्याबाबत तसेच संबंधित दोषींवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे :** (१) अंशत: खरे आहे.

सोनके (ता.कोरेगाव, जि.सातारा) येथे महाराष्ट्र ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था या नावाची कोणतीही पतसंस्था नसून आदर्श ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था ही एकमेव पतसंस्था सध्यस्थितीत कार्यरत आहे.

सदर पतसंस्थेच्या सन २०१९-२० व २०२०-२१ या कालावधीचा वैधानिक लेखापरिक्षण अहवाल व त्यानुषंगाने सादर केलेला विनिर्दीष्ट अहवालानुसार सदर संस्थेमध्ये रुपये १२.५९ कोटी इतक्या रक्कमेचा गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) नाही.

उपरोक्त नमुद रुपये १२.५९ कोटी रक्कमेपैकी रुपये ६.३२ कोटी इतकी रक्कम संस्थेकडे जमा झालेली आहे. तसेच ठेवीदारांना रुपये ७८.०० लाख इतक्या रक्कमेच्या ठेवी अदा करण्यात आल्या आहेत.

(३) व (४) सदर संस्थेच्या सन २०१९-२० व २०२०-२१ या कालावधीचा वैधानिक लेखापरिक्षण अहवाल व विनिर्दीष्ट अहवालातील शिफारसीनुसार लेखापरिक्षक यांनी पोलीस स्टेशन, मौ. वाठार, ता. कोरेगांव, जि. सातारा येथे दिनांक १६.०१.२०२३ रोजी संस्थेचे चेअरमन व संचालक यांचेवर गुन्हा क्र. ००२० दाखल केलेला असून पोलीसांमार्फत पुढील कार्यवाही सुरु आहे. तसेच संस्थेमध्ये झालेल्या गैरव्यवहाराची आर्थिक जबाबदारी निश्चित

करण्यासाठी अधिनियमाच्या कलम ८८ अन्वये दिनांक ०३.०२.२०२३ रोजी चौकशीचे आदेश देण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**देऊळगांवराजा (जि.बुलढाणा) येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेत शासकीय रक्कमेचा झालेला अपहार**

**(८) * ६१६१८ श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देऊळगांवराजा (जि.बुलढाणा) येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेंतर्गत नवीन विहिरी न खोदता तसेच दुरुस्ती न करता जुन्या विहिरींवरच अडीच लाख रुपयांचे अनुदान तसेच बोगस शेतकऱ्यांच्या नावे शासकीय रक्कमेचा अपहार केला असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अपहारामुळे खरे लाभार्थी उक्त योजनेच्या लाभापासून वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार :** (१) हे खरे नाही, देऊळगाव राजा जि.बुलढाणा येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना अंतर्गत सन २०२०-२१, २०२१-२२ व २०२२-२३ एकही गांव सुरक्षीत पाणलोट क्षेत्रात येत नसल्यामुळे एकही नवीन विहीरीचे काम झालेले नसुन केवळ जुनी विहीर दुरुस्तीचे कामे झालेली आहेत.

यासाठीचे अनुदान लाभार्थ्यांच्या आधार लिंक खात्यात PFMS प्रणालीद्वारे जमा करण्यात आलेले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान कर्जमुक्ती योजनेत पात्र असलेल्या शेतकऱ्यांना वसुलीसाठी बजाविण्यात आलेल्या नोटीसा**

**(९) * ६२५५४ श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), अॅड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.संजय जगताप (पुरंदर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान कर्जमुक्ती योजनेसाठी शेकडो शेतकरी पात्र असतानाही कर्जाची वेळेत परतफेड होऊ न शकल्याने हजारो शेतकऱ्यांना थकबाकीबाबत वसुलीच्या सक्तीच्या नोटीस सहकार निबंधक कार्यालयाकडून मिळाल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच काटोल (जि.नागपूर) येथील १५८९ शेतकऱ्यांनी सन २०१७ या कालावधीत कर्ज घेतले होते, मात्र कर्जमुक्तीसाठी पात्र असूनही ते मदतीपासून वंचित राहिल्याने बहुतांश शेतकऱ्यांना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक व तालुका सहकारी निबंधक कार्यालयामार्फत वसुलीच्या नोटीसा बजाविण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे :** (१) होय.
(२) होय.
(३) सदर योजनेचा लाभ पात्र शेतकऱ्यांना देण्याबाबत वित्तीय तरतूद करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात आंबा पिकाला हमीभाव मिळावा याकरीता स्वतंत्र "आंबा बोर्ड" स्थापन करण्याबाबत

**(१०) * ६२७७५ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आंबा पिकाला हमीभाव मिळावा आणि आंबा बागायतदारांच्या मागण्या व समस्या सोडविण्यासाठी काजू बोर्डाच्या धर्तीवर स्वतंत्र "आंबा बोर्ड" (Mango Board) स्थापन करण्यात येणार असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या आंबा व काजू बागायतदार नुकसानग्रस्तांना दिलासा देण्याकरीता शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,
(३) असल्यास, यासंदर्भात शेतकऱ्यांना पीकविमा मोबदला देण्याबाबत तसेच स्वतंत्र 'आंबा बोर्ड' (Mango Board) स्थापन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे :** (१) होय, हे खरे आहे.

राज्यातील काजू फळपिकाच्या सर्वकष विकासासाठी क्रमांक:काविधो-२०२०/प्र.क्र. १७६/ ९-अे, दिनांक १६.०२.२०२३ अन्वये शासन निर्णय निर्गमित करण्यात आला असून त्याद्वारे "आंबा बोर्ड" स्थापन करण्यास तत्वत: मान्यता देण्यात आली आहे.
(२) मसहूल व वन विभागाचा शासन निर्णय, दिनांक २२ ऑगस्ट, २०२२ अन्वये माहे जून ते ऑक्टोबर, २०२२ या कालावधीतील नैसर्गिक आपत्तीमुळे फळपिकाखालील बाधित झालेल्या क्षेत्राकरिता प्रचलित दरांपेक्षा दुप्पट दरांने मदत देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार फळपिकाखालील क्षेत्रासाठी रुपये ३६,०००/- प्रति हेक्टर ३ हेक्टरच्या मर्यादेत मदत देय आहे.
(३) आंबिया बहार सन २०२१-२२ मध्ये आंबा फळपिकासाठी एकूण ५९५१५ शेतकऱ्यांना रुपये २०८.६६ कोटी तर काजू फळपिकासाठी एकूण १०,९५५ शेतकऱ्यांना रुपये २५.०७ कोटी अशाप्रकारे आंबा व काजू फळपिकासाठी मिळूण एकूण ७०४७० शेतकऱ्यांना रुपये २३३.७३ कोटी इतकी रक्कम विमा कंपनीमार्फत वितरित करण्यात आली आहे.

शासन निर्णय, क्रमांक:काविधो-२०२० / प्र.क्र.१७६/९-अे, दिनांक १६ फेब्रुवारी, २०२३ अन्वये “स्वतंत्र आंबा बोर्ड” स्थापन करण्यास तत्वत: मंजूरी देण्यात आल्यानुसार पणन विभागाने आंबा व काजू मंडळ स्थापन करणेबाबतचा प्रस्ताव तात्काळ सादर करण्याबाबतच्या सूचना पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे तसेच कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे यांना दिल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बीड व पुणे जिल्ह्यात गहू व हरभरा या पिकांवर विविध रोगांचा झालेला प्रादुर्भाव

**(११) * ५७४२७ श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.अजित पवार (बारामती), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यात गव्हाच्या पिकावर तांबोरा व मावा तसेच हरभऱ्याच्या पिकावर घाटे अळी रोगाचा प्रादुर्भाव पसरल्याचे माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच पुणे जिल्ह्यात सध्या अनपेक्षित पावसाळी परिस्थिती निर्माण झाल्यामुळे धुके व प्रदूषित वातावरणामुळे हरभरा पिकावर मर रोगाचा आणि बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव वाढून उत्पादनात नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, थंडी व ढगाळ वातावरणात दिवसेंदिवस वाढ होत असून उक्त रोगांच्या प्रादुर्भावामुळे हजारो हेक्टरवरील गहू व हरभरा पिकांचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त रोगांवर नियंत्रण मिळविण्यासाठी तसेच गहू व हरभरा पिकांचे नुकसान होऊ नये यासाठी कृषी विभागाकडून कोणत्या उपाययोजना केल्या आहेत व त्यानुसार शेतकऱ्यांना आर्थिक मदत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार : (**१) अंशत: खरे आहे.

बीड जिल्हयातील आष्टी तालुक्यात गहू पिकाचे पेरणी क्षेत्र ११५३२ हे. असून ३४० हे. क्षेत्रावर तांबेरा रोगाचा व १८५ हे. क्षेत्रावर मावा या किडीचा प्रादुर्भाव दिसून आला होता. तथापि सदरील प्रादुर्भाव पेरणी क्षेत्राच्या नगन्य असून आर्थिक नुकसान पातळीच्या (५ टक्यापेक्षा कमी) खाली आहे. तसेच हरभरा पिकाचे पेरणी क्षेत्र १५०३० हे. असून ३६५ हे. क्षेत्रावर घाटेअळी या किडीचा प्रादुर्भाव आढळून आला होता. तथापि सदरील प्रादुर्भाव पेरणी क्षेत्राच्या नगन्य असून आर्थिक नुकसान पातळीच्या (५ टक्यापेक्षा कमी) खाली आहे. अन्य तालुक्यामध्ये गहू तसेच हरभरा या पिकांवर असा प्रादुर्भाव दिसून आला नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) पिकांवरील किड रोग सर्वेक्षण व सल्ला प्रकल्प (क्रॉपसॅप) अंतर्गत कृषि विभागाच्या अधिकारी/ कर्मचारी यांचेमार्फत सर्वेक्षण करण्यात येत आहे. जिल्हा मासिक चर्चासत्र, स्थानिक वृत्तवाहिनी, गावबैठका, शास्त्रज्ञ भेटी, शेतीशाळा, एस. एम. एस., जंबो झेरॉक्स इ. च्या माध्यमातून किड व्यवस्थापनाबाबत जनजागृती करण्यात आली आहे. तसेच किड व रोगाच्या नियंत्रणाकरीता प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून ५० टक्के अनुदानावर पीक संरक्षण औषधे व कामगंध सापळे इ. च वाटप करण्यात आले आहेत. त्यामुळे गहू व हरभरा पिकावर किड व रोगाचा प्रादुर्भाव नियंत्रणात राहीला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील धोबी व वरठी या जातीच्या लोकांना इतर मागासप्रवर्गाचे जात प्रमाणपत्र काढताना येत असलेल्या अडचणींबाबत

**(१२) * ६२२०३ श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील धोबी व वरठी या जाती इतर मागास प्रवर्ग यादीत वेगवेगळया क्रमांकावर नमूद असल्यामुळे एकाच घरात आजोबा, वडील व मुलांच्या जातीचा उल्लेख धोबी व वरठी असा वेगवेगळा असल्यास त्यांच्या मुलांना जात पडताळणी प्रमाणपत्र काढताना अडचणी निर्माण होत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाच्या इतर मागास प्रवर्ग जातीच्या यादीतील अ.क्र.१२५ वर असलेली धोबी, परीट व अ.क्र.१६६ वर असलेली वरठी जात एकाच अनुक्रमांकावर नमूद करण्यात यावी, अशी मागणी श्री संत गाडगेबाबा धोबी, वरठी समाज मंडळ, चंद्रपूर यांनी शासनाकडे वारंवार केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग, पुणे यांनी सामाजिक न्याय भवन, नागपूर येथे उक्त संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना यासंदर्भात सुनावणीकरीता बोलावून धोबी व वरठी जातीमधील रोटी-बोटी व्यवहार, लग्नकार्य व नातेसंबंध पुराव्याचे दस्तऐवज दिनांक १५ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास सादर करुन घेतले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, त्यानुषंगाने महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग, पुणे यांनी या संदर्भातील अहवाल शासनास सादर केला आहे काय,
(५) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे :** (१) हे खरे आहे.
(२) श्री. संत गाडगेबाबा धोबी, वरठी समाज मंडळ, चंद्रपूर यांनी दिनांक १३.०९.२०२२ रोजी महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग, पुणे यांच्याकडे निवेदन सादर केले आहे.
(३) हे खरे आहे.
(४) व (५) सदर प्रकरण नागपूर उपसमितीकडे अभ्यासासाठी सोपविण्यात आले आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गोरेगाव (मुंबई) तसेच नागपूर, पुणे, लातूर आणि कडेपूर (सांगली) येथील महानंदाचे दूध संकलन प्रकल्प पूर्ण क्षमतेने सुरु करण्याबाबत

**(१३) * ६०७७२ श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.अनिल बाबर (खानापूर) : श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्रीमती यामिनी जाधव (भायखळा)** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघ मर्यादित मुंबई महानंदाची दैनंदिन दूध संकलन क्षमता सुमारे दहा लाख लिटर असताना ती ऐंशी हजार लिटरवर आली आहे, तसेच दूध पावडर व बटर प्रकल्प पुरेशा दूधाअभावी बंद असून महानंदा प्रकल्प बंद होण्याच्या स्थितीत असल्याचे दिनांक ३० जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास शासनाच्या निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, नागपूर, पुणे, लातूर आणि कडेपूर (सांगली) येथील दूध संकलन प्रकल्प सुद्धा पूर्ण क्षमतेच्या केवळ १५ टक्के सुरु असल्यामुळे महानंदाच्या कर्मचाऱ्यांना मासिक वेतन देण्याची आर्थिक क्षमता महानंदा संघाकडे राहिलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) त्याचप्रमाणे, गोरेगाव येथे महानंदाच्या एक लाख लिटर क्षमतेचा अत्याधुनिक टेट्रा प्रकल्प तयार असून या प्रकल्पासाठीही दूध मिळत नसल्याने सैन्य दलाला रोज दूध पुरवठा करण्याचा मिळालेला ठेका ही रद्द झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, परराज्यातून येणाऱ्या दूधाचे नियंत्रण महानंदामार्फत केल्यास तसेच राज्यात विविध शासकीय योजनांर्तगत व विविध ठिकाणी दूधाचा पुरवठा महानंदामार्फत केल्यास महानंदाची आर्थिक क्षमता वाढण्यास मदत होईल, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, महानंदाच्या नागपूर, पुणे, लातूर, सांगली, गोरेगाव आणि जिल्हा दूध संघातून येणाऱ्या दूधात वाढ करून पुन्हा गावो गावी दूध संघाची केंद्रे सुरू करावीत अशी मागणी दूध उत्पादकांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार महानंदाची पुन्हा एकदा नव्याने उभारणी करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२) व (३) महासंघाच्या उपविधीप्रमाणे सदस्य संघाकडून त्यांच्या संकलानाच्या ५ टक्के दूध पुरवठा महासंघास केला जात नसल्यामुळे महासंघाच्या दूध संकलनात घट झाली आहे. परिणामी गोरेगांव येथील महानंदाच्या टेट्रा पॅक प्रकल्पासाठीही दूध मिळत नसल्याने सैन्य दलाला दूध पुरवठा करण्याचा ठेका रद्द झाला आहे. तसेच, दूध पुरवठ्याअभावी महासंघाची प्रकल्प क्षमता, कर्मचारी यंत्रणेचा पुरेपुर वापर होत नसल्यामुळे महासंघाची आर्थिक स्थिती ढासळली आहे, ही वस्तुस्थिती आहे.

(४), (५) व (६) महानंदची खालावलेली आर्थिक स्थिती व त्यानुषंगाने करावयाच्या उपाययोजनेसंदर्भात महासंघास उर्जितवस्था प्राप्त करून देण्यासाठी राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळाबरोबर (NDDB) चर्चा सुरू आहे.

-----------------

## राज्यात व विशेषत: सोलापूर जिल्ह्यात भूमी अभिलेख कार्यालयाकडे मोजणी प्रकरणे वर्षानुवर्षे प्रलंबित असल्याबाबत

**(१४) * ५७७२४ श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात भूमी अभिलेख कार्यालयात कर्मचाऱ्यांची अपुरी संख्या व साहित्याचा तुटवडा असल्यामुळे जमीन मोजणी, गावठाण सिटी सर्व्हे नोंदी, भूसंपादनाच्या मोजण्या प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सोलापूर जिल्ह्यातील सिंचन प्रकल्पाच्या शेतजमीन मोजणीची कामे वेळेत होत नसल्यामुळे प्रकल्पाची कामे संथ गतीने सुरु आहेत तसेच जिल्ह्यातील अनेक तालुक्यांमध्ये उपअधिक्षकासह इतर पदे रिक्त असल्याने त्याचा परिणाम कामकाजावर होत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांनी शासकीय फीचा भरणा करुनही फारच कमी प्रकरणांची मोजणी होत असल्यामुळे दिवसेंदिवस मोजणीच्या प्रकरणांमध्ये वाढ होत असून हजारो प्रकरणे मोजणीअभावी प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन राज्यातील व विशेषतः सोलापूर जिल्ह्यातील जमीन मोजणीची कामे वेळेत पूर्ण करण्याकरिता आवश्यक मनुष्यबळ व साहित्य उपलब्ध करून प्रलंबित प्रकरणे कालबध्द मर्यादेत निकाली काढण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२) व (३) हे अंशत: खरे आहे. सोलापूर जिल्हयामध्ये भूमी अभिलेख विभागांतर्गत सर्व संवर्गाच्या एकूण ३३३ मंजूर पदांपैकी ९४ पदे रिक्त असून उप अधिक्षक संवर्गामध्ये कोणतेही पद रिक्त नाही, तथापि, यापैकी ६० पदे गट क पदसमुहाची रिक्त आहेत.

सोलापूर जिल्हयामध्ये माहे एप्रिल, २०२२ ते जानेवारी, २०२३ अखेर एकूण १२८४५ मोजणी प्रकरणे प्राप्त असून त्यापैकी एकूण ७७३१ मोजणी प्रकरणे निकाली काढण्यात आली असून एकूण ५११४ मोजणी प्रकरणे प्रलंबित आहेत. यापैकी ४२ प्रकरणे भूसंपादनाची असून याबाबत कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रलंबित मोजणी प्रकरणाचा निपटारा करण्यासाठी भूकरमापक यांना मोजणी कामासाठी मदतनिस उपलब्ध करून देण्यात आले आहेत. त्याचबरोबर मोजणीसाठी पुरेशा प्रमाणात ई.टी.एस. मशीन व रोव्हर्स मशीन उपलब्ध करून देण्यात आले असून माहे सप्टेंबर, २०२२ अखेरची सर्व प्रलंबित मोजणी प्रकरणे मार्च, २०२३ अखेर निकाली काढण्याचे नियोजन करण्यात आले आहे. तसेच भूकरमापक/लिपीक या गट क संवर्गातील १२६८ रिक्त पदे भरती करण्याकरीता ऑनलाईन परीक्षा घेण्यात आली असून सदर परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आला आहे.

लवकरच सदर पदांवर पात्र उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सिन्नर-शिर्डी महामार्गाच्या कामासाठी अवैधरित्या माती, मुरुम व दगडाचे उत्खनन करुन वाहतुक केल्याबाबत

**(१५) * ६२७९१ ॲड.माणिकराव कोकाटे (सिन्नर), श्री.अनिल पाटील (अमळनेर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिन्नर-शिर्डी महामार्गाच्या कामासाठी महामार्गाचे ठेकेदार मे.मोन्टोकार्लो यांचेमार्फत परिसरातील वावी,

मिरगाव, पाथरे, मऱ्हळ, नांदूर या गावाच्या परिसरातून अवैधरित्या माती, मुरुम व खडीचे उत्खनन करुन वाहतूक करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अवैध उत्खनन व वाहतूकीकडे संबंधित विभागाचे दुर्लक्ष झाल्यामुळे शासनाच्या महसूलाचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन दंडासह वसुलीबाबत तसेच दोषींविरुध्द करण्यासंदर्भांत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२), (३) व (४) सिन्नर-शिर्डी महामार्गाचे कामामधील संबंधित कंपनीमार्फत मौजे वावी येथे २०,०९१ ब्रास गौणखनिजाचे उत्खनन केल्याप्रकरणी रुपये १,२०,५४,६००/- व मौजे मिरगाव येथे २८,१०६ ब्रास गौणखनिजाचे उत्खनन केल्याप्रकरणी रुपये १,४८,०२,२००/- इतक्या स्वामित्वधनाची रक्कम संबंधित कंपनीडून शासन जमा केली आहे. पाथरे खु, पाथरे बु, मऱ्हळ खु, मऱ्हळ बु, नांदुरशिंगोटे या गावामध्ये संबंधित कंपनीमार्फत कोणत्याही प्रकारे गौणखनिजाचे उत्खनन केले असल्याचे निदर्शनास आले नाही.

सदर कंपनीला पूर्व परवानगी शिवाय मौजे पिंपरवाडी, ता. सिन्नर, जि. नाशिक येथील ग. नं. ११७ व ११८ येथील गटातून ३२० ब्रास अनाधिकृत दगड उत्खननापोटी रुपये ३२,१८,०००/- रक्कमेचे संबंधित कंपनी विरुद्ध दंडात्मक कार्यवाहीचे आदेश तहसिलदार, सिन्नर यांच्याकडून पारित करण्यात आले आहेत. तसेच संबंधित कंपनीचे मुरूम या गौणखनिजाचे अनाधिकृतरित्या उत्खनन करून वाहतूक करीत असल्याचे २ वाहने आढळून आल्याने त्यावर गौणखनिज दंडाची व वाहनाची शास्तीची रुपये ४,९७,४००/- इतक्या रकमेच्या नोटीसा संबंधित कंपनीस बजावण्यात आल्या आहेत.

-----------------

## चांगेफळ-भेंडफळ रस्त्यावरील रेल्वे उड्डाणपुलाचे काम करताना कंपनीने रॉयल्टी न भरता अतिरिक्त गौण खनिजांचे उत्खनन केल्याबाबत

**(१६) * ५६६३८ ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भास्तन माटरगांव खामगांव (जि.बुलढाणा) येथील चांगेफळ-भेंडवळ रस्त्यावरील रेल्वे उड्डाणपुलाचे काम श्री आर.बी.घोडके इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.औरंगाबाद यांचेकडून करताना रॉयल्टी न भरता तसेच परवानगीपेक्षा जास्त गौण खनिज उत्खनन केल्याबाबत तहसिलदार, शेगांव यांनी रुपये ४५,१५,६००/- इतकी रक्कम शासनाकडे जमा करण्याचे आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कंत्राटदाराला फक्त १०० ब्रास चे २ परवाने दिले असतानाही कामाच्या ठिकाणी ६२६ ब्रास मुरुमाचा साठा आढळला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या संदर्भात उपविभागीय अधिकारी, खामगाव यांनी देखील तहसिलदारांचा कारवाईचा आदेश दिनांक २२/१२/२०२२ रोजी कायम ठेवला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी कंत्राटदार कंपनीने ही सदरहू दंडाची रक्कम अद्यापही शासनजमा केलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन दंडासह उक्त रक्कम वसुल करुन संबंधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

(४), (५) व (६) संबंधित कंपनिविरूध्द तहसिलदार, शेगांव यांनी दिनांक २२.१२.२०२१ केलेली दंडात्मक कारवाईचे आदेश अपर जिल्हाधिकारी, बुलढाणा यांनी रद्द करून संबंधित कंपनिस देण्यात आलेल्या उत्खनन परवान्या व्यतिरिक्त अतिरिक्त उत्खनन केलेल्या ४२६ ब्रास च्या मुरूम या गौण खनिजाची स्वामित्वधन भरणा करून घेण्यास नोटीस तहसिलदार, शेगाव यांनी द्यावी व सदर स्वामित्वधन भरणा न केल्यास महाराष्ट्र जमिन महसूल संहिता, १९६६ कलम ४८ नुसार कारवाई करण्याचे आदेश पारित केले. त्यानुषंगाने सबंधित कंपनीने ४२६ ब्रास मुरूम या गौण खनिजाचे रुपये २,५५,६००/- इतके स्वामित्वधन शासन जमा केले आहे.

-----------------

## "रंगकर्मी आंदोलन महाराष्ट्र" मुंबई यांनी त्यांच्या मागण्यांसाठी केलेली निदर्शने

**(१७) * ६१६२६ डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रातील रंगकर्मी हे असंघटित असून माथाडी कामगारांच्या धर्तीवर रंगकर्मी बोर्डाची स्थापना करावी तसेच कलाकार पेन्शन योजनेचा लाभ घेण्यासाठी असलेल्या अटींमध्ये शिथिलता आणावी व मानधनाच्या रकमेत वाढ करावी इ. अशा अनेक प्रकारच्या मागण्यांसाठी महाराष्ट्रातील रंगकर्मींनी निदर्शने केली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, "रंगकर्मी आंदोलन महाराष्ट्र" यांच्या वतीने श्री. विजय पाटकर, अभिनेते यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने तत्कालीन सांस्कृतिक कार्य मंत्री यांची उक्त मागण्यांसंदर्भात भेट घेतली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई वा इतर ठिकाणी कला सादर करणाऱ्या रंगकर्मींना भाडेतत्त्वावर देणाऱ्या निवासी गाळयांमध्ये प्राधान्याने व सवलतीच्या दरात सोय करणे तसेच प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी रंगकर्मींसाठी विश्रामगृहे बांधण्याबाबत उक्त बैठकीत आश्वासित करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, रंगकर्मींची शासन दरबारी नोंद होण्याकरीता ऑनलाईन पध्दतीने नोंदी करण्याचे तत्कालीन सांस्कृतिक कार्य मंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी आदेशित करुनही शासन स्तरावर नोंद घेण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास याप्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३), (४) व (५) रंगकर्मी आंदोलन महाराष्ट्र यांनी तत्कालीन मंत्री, सांस्कृतिक कार्य यांना सादर केलेल्या निवेदनामध्ये, मुंबई व इतर ठिकाणी कला सादर करणाऱ्या कलाकारांना भाडेतत्वा वर देण्यासाठी शासनातर्फे बांधण्यात येणाऱ्या निवासी गाळयांमध्ये प्राधान्याने व सवलतीच्या दरात सोय करण्यात यावी, तसेच प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी रंगकर्मीसाठी विश्रामगृह असावीत, तसेच महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यात विखुरलेल्या रंगकर्मींची शासन दरबारी नोंद व्हावी, अशा मागण्या अंतर्भूत होत्या. रंगकर्मी आंदोलन महाराष्ट्र, मुंबई यांच्या प्राप्त निवेदनातील मागण्या वेगवेगळ्या विभागांशी संबंधित असल्याने संबंधित विभागांकडे उचित कार्यवाहीसाठी पाठविण्यात आल्या आहेत. विभागाशी संबंधित मागण्यांबाबत शासन सकारात्मक आहे.

-----------------

## अमरावती तालुक्यातील कठोरा गांधी ते खानापुर व कठोरा गांधी ते सालोरा खुर्द हे दोन्ही रस्ते वहीवाटीसाठी बंद असल्याबाबत

**(१८) * ५७८६२ ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.संजय जगताप (पुरंदर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती तालुक्यातील कठोरा गांधी ते खानापुर व कठोरा गांधी ते सालोरा खुर्द हे दोन्ही रस्ते शेतकऱ्यांच्या वहीवाटीसाठी अत्यंत महत्वाचे असुन येण्या-जाण्यासाठी रस्ता बंद केल्यामुळे शेतकऱ्यांना अडचणी निर्माण होत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त रस्त्यांची नि:शुल्क मोजणी करुन शेतकऱ्यांना वहीवाटीसाठी रस्ता मोकळा करुन देण्याबाबत मा. जिल्हा अधिक्षक, भुमी अभिलेख कार्यालय, अमरावती यांना स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २४ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) हे खरे नाही.

अमरावती तालुक्यातील कठोरा गांधी ते खानापूर व कठोरा गांधी ते सालोरा खुर्द हे दोन्ही रस्ते शेतकऱ्यांना जाण्या-येण्यासाठी बंद केलेले नाहीत. त्यामुळे शेतकऱ्यांना कोणतीही अडचण निर्माण होत नाही.
(२), (३) व (४) हे खरे आहे.

स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे दिनांक २४/११/२०२२ रोजीचे निवेदन जिल्हा अधिक्षक, भूमी अभिलेख, अमरावती यांचे कार्यालयास दिनांक २५/११/२०२२ रोजी प्राप्त झाले. अमरावती तालुक्यातील मौजा कटोरा गांधी ते खानापूर व कठोरा गांधी ते सालोरा खुर्द या रस्त्यांची मोजणी दिनांक २३/२/२०२३ रोजी पूर्ण करण्यात आली असून संबंधित ग्रामपंचायतीला मोजणी आलेख दिनांक २४/२/२०२३ रोजी पुरविण्यात आला आहे.

-----------------

## भंडारा व गोंदिया जिल्ह्यात बदली पासच्या नावावर सागवान लाकडाची तस्करी करण्यात येत असल्याबाबत

**(१९) * ६०४८९ श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा व गोंदिया जिल्ह्यातील जंगलात बदली पासच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात अवैधरित्या सागवान वृक्षतोड होऊन तस्करी करण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच गोठणगांव, नवेगांवबांध, अर्जुनी मोरगाव व लाखांदूर परिसरातील सरकारी जमीनीवरील सागवान लाकडाचा साठा लाखनी परिसरात केला जात असल्याची माहीती असूनही तस्कर व वन अधिकाऱ्यांच्या संगनमतामुळे यासंदर्भात कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) भंडारा जिल्ह्यातील जंगलात बदली पासच्या नावावर सागवान तस्करी या संदर्भात दैनिक लोकमत या वृत्तपत्रात दिनांक १२.०१.२०२३ रोजीच्या बातमीच्या अनुषंगाने वनपरिक्षेत्र अधिकारी, लाखनी यांनी चौकशी केली असता, ती वस्तुस्थितीला धरुन नसल्याचे चौकशीअंती निदर्शनास आले आहे. याबाबत मुख्य वार्ताहर दैनिक लोकमत भंडारा यांना चौकशी अहवालाची प्रत वनपरिक्षेत्र अधिकारी लाखनी यांनी दिली आहे.

गोंदिया जिल्हयातील गोंदिया वनविभागांतर्गत जंगलात बदली पासच्या नावाखाली मोठया प्रमाणात अवैधरित्या सागवान वृक्षतोड व तस्करी करण्यात येत असल्याबाबत माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान कोणतीही घटना उघडकीस आलेली नाही.

(२) गोंदिया वनविभागातील गोठणगाव, नवेगांवबांध, अर्जुनी मोरगाव वनपरिक्षेत्रातील सरकारी जमीनीवरील सागवान लाकडाची लाखनी परिसरात साठा केला जात असल्याबाबत कोणतीही घटना वा प्रकार आढळून आलेला नाही.

भंडारा वनविभागांतर्गत लाखांदुर परिसरात सरकारी जमीनीवरील वृक्षतोड अथवा तस्करीची कोणतीही घटना घडलेली नाही. तसेच लाखनी परीसरात अवैधरित्या तोड केलेल्या सागवान लाकडांचा साठा केला जात असल्याची कोणतीही घटना घडलेली नाही.

तथापि, दिनांक १२.१.२०२३ रोजी दैनिक लोकमत या वृत्तपत्रात प्रकाशीत बातमीच्या अनुषंगाने केलेल्या तपासात गोंदिया वनविभागातील गोठणगांव वनपरिक्षेत्रांतर्गत श्री.नरेश अभिमन टेंभुर्णे रा. गोठणगाव जिल्हा गोंदिया याचे खाजगी गट क्र. ५७ प.ह.न. २६ क्षेत्र २.९७ हे.आर. मधिल सागवान ७१ नग ६.३२१ घ.मी. व सागवान २ चाकभर माल श्री. पुरुषोत्तम देशमुख यांनी खरेदी करुन वनपरिक्षेत्र अधिकारी गोठणगाव यांचे ऑनलाईन वाहतुक परवान्यानुसार सदर मालाची वाहतूक त्यांच्या राहत्या घरापर्यंत केली असून, त्यानंतर सदर मालाची बदली पास घेऊन पुढील वाहतूक करण्यात आली आहे. सदर प्रक्रिया करतांना लाकडाची परिपुर्ण तपासणी करण्यात आली असून महाराष्ट्र वृक्षतोड अधिनियम १९६४ मधील तरतुदीनुसार रितसर परवानगीने खाजगी क्षेत्रातील सागवान वृक्षांची तोड करुन वाहतुक परवान्यासह वाहतुक करण्यात आली आहे. त्यामध्ये कोणताही गैरप्रकार घडलेला नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे व पालघर जिल्ह्यातील बुलेट ट्रेन प्रकल्पासाठी केलेल्या भूसंपादनात जमिनींचा मोबदला देताना शेतकऱ्यांची झालेली फसवणूक

**(२०) * ६२२९३ श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिंवडी (जि.ठाणे) तालुक्यात बुलेट ट्रेन प्रकल्पासाठी केलेल्या भूसंपादन जमिनींचा मोबदला देताना शेतकऱ्यांची फसवणूक केल्याप्रकरणी भिवंडीचे तत्कालीन उपविभागीय अधिकारी आणि विद्यमान उपविभागीय अधिकारी यांना माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निलंबित केले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, ठाणे व पालघर जिल्ह्यातील भूसंपादनात जमिनींचा मोबदला देताना शेतकऱ्यांची फसवणूक केल्याप्रकरणी तक्रारींची विभागीय आयुक्तांमार्फत सुरु असलेली चौकशी पूर्ण झाली असल्यास चौकशीचे निष्कर्ष काय आहेत,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कालबध्द मर्यादेत शेतकऱ्यांना जमिनीचा योग्य मोबदला देण्याबाबत व या प्रकरणी दोषींवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) भिंवडी (जि. ठाणे) या तालुक्यात बुलेट ट्रेन प्रकल्पासाठी केलेल्या भूसंपादनात जमिनीचा मोबदला देण्यासंदर्भात प्राप्त तक्रारी आणी विधीमंडळास आश्वासित केल्यानुसार भिवंडीचे तत्कालीन आणि विद्यमान उपविभागीय अधिकारी यांना शासन आदेश दिनांक ३०.१२.२०२२ अन्वये निलंबित केले आहे.
(२), (३) व (४) बुलेट ट्रेन, मुंबई-अहमदाबाद द्रुतगती मार्ग, दिल्ली फ्रीट कॉरीडोर, प्रकल्पाच्या भूसंपादनात अनियमितता अथवा गैरव्यवहार झाल्याबाबत प्राप्त विविध तक्रारी व दाखल गुन्ह्यात सक्षम प्राधिकारी व अन्य महसूल अधिकारी यांचा सहभाग असल्याबाबत पडताळणी करुन चौकशी अहवाल शासनास सादर करण्याकरीता शासनाने विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली शासन परिपत्रक दिनांक २३.२.२०२३ अन्वये "चौकशी समिती" गठित केली आहे.
सदर समितीचा अहवाल मार्च अखेरीस शासनास सादर होणे अपेक्षित आहे.

-----------------

## ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या वरिष्ठ सहाय्य व कनिष्ठ सहाय्य अधिकारी पदांच्या भरतीत झालेली अनियमितता

**(२१) * ५६७२७ डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या वरिष्ठ सहाय्य अधिकारी आणि कनिष्ठ सहाय्य अधिकारी पदांच्या १७९ जागांवर नोकर भरती करताना अनियमितता आणि गैरव्यवहार झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त नोकरभरती रद्द करुन नव्याने भरती प्रक्रिया राबविण्याचे आदेश मा.मुंबई उच्च न्यायालयाने दिनांक १२ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास शासनास दिले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन नव्याने भरती प्रक्रिया राबविण्याबाबत तसेच दोषींवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात यत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे :** (१) अंशत: खरे आहे. याबाबत मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका दाखल झाली होती.
(२) व (३) होय. तथापी सदर आदेशास मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांनी दिनांक ०६.०२.२०२३ रोजीच्या आदेशान्वये पुढील सुनावणीपर्यंत स्थगिती दिली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शेतकरी व शेतमजुरांना नियमानुकूल करुन मालकी हक्काचे पट्टे देण्याबाबत

**(२२) * ६१८९८ श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सन २०११ पूर्वीचे गावठाण तसेच झुडपी जंगल व इतर शासकीय जमिनीवरील २५ ते ३० वर्षांपासून अतिक्रमण करुन वास्तव्य करणाऱ्या व शेतजमीन वाहत असलेल्या शेतकरी व शेतमजुरांना उक्त जमीन नियमानुकुलीत करुन मालकी हक्काचे पट्टे वाटप करण्याबाबत सन २०१७ मध्ये शासन निर्णय काढण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त शासन निर्णयाची अंमलबजावणी करणे बंधनकारक असतानाही संबंधित विभागाच्या अधिकारी कर्मचारी यांनी याकडे दुर्लक्ष केले असल्याने संबंधितांना अद्यापही मालकी हक्काचे पट्टे मिळाले नसल्याचे माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शेतकरी व शेतमजुरांना मालकी हक्काचे पट्टे देण्याबाबत तसेच दोषींवर कारवाई करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) हे खरे नाही.

तथापि, मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन नियम, १९५६ मध्ये दिनांक २७.०४.२०१८ च्या अधिसूचने अन्वये " कलम ११ अ " नव्याने समाविष्ट करण्यात आले असून त्याअन्वये शेतमजूर व कारागिरांच्या राहत्या घरांच्या जागा यांच्या बाबतचे अधिकार अभिलेख तयार करण्याची रीत / कार्यपद्धती विहित करण्यात आली आहे. या कार्यपद्धतीनुसार संबंधित विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांना त्यांच्या कार्यक्षेत्रात शेतमजूर आणि कारागिरांच्या राहत्या घरांच्या जागा यांच्या बाबतीत अधिकार अभिलेख तयार करण्याचे निर्देश शासनाने दिले होते. या निर्देशानुसार क्षेत्रीय स्तरावर अधिकार अभिलेख तयार करण्याची कार्यवाही पूर्ण झाली आहे. या अधिकार अभिलेखांस अंमल देण्याकरीता शासनाने दिनांक १.०४.२०२२ च्या अधिसूचनेन्वये शेतमजूर व कारागिरांच्या गावातील वस्त्यांची ठिकाणे व घराखालील जमिनींच्या कब्जाबाबत दिनांक ३१.०५.२०२२ हि तारीख "कट ऑफ डेट" म्हणून विनिर्दिष्ट केली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे शिरसाड (ता. वसई जि. पालघर) येथील मृत आदिवासीच्या नावावर असलेली जमीन शासनाने जमा करून घेण्याबाबत

**(२३) * ६०६२६ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुनील राणे (बोरीवली) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे शिरसाड (ता.वसई जि.पालघर) येथील कै.जिव्या पोट्या वरठा या मृत आदिवासीच्या नावे असलेली जुने सर्वे नं. ५२, ५३, ५७, ६५, ६६, १६७, १४१ (ई) १८१,(४) १८१ (६) तसेच नवीन सर्वे नं. ४०, ३३, ४४, ६९, ७०, ७१, ७७, ७८ व ७९ या मुळ आदिवासी जमिन मिळकतीवर वरठा कुटुंबांचा कोणीही वारसदार नसतांना बोगस फेरफार करुन ७/१२ वर सुरेश रत्नाकर मराड व इतरांची नावे लावण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नामांतरणास तलाठी कार्यालय शिरसाड फाटा, जिल्हाधिकारी पालघर यांचेकडून परवानगी देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर बिगर आदिवासी खातेदाराची जमीन शासनजमा करून घेण्याबाबत राज्यस्तरीय आदिवासी विकास आढावा समितीचे अध्यक्ष तथा लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, जि.पालघर तसेच आयुक्त, वसई-विरार महानगरपालिका यांच्याकडे दिनांक ५ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास पत्राद्वारे विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून उक्त जमीन ताब्यात घेण्याबाबत तसेच दोषींवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२), (३), (४) व (५) मौजे खैरपाडा व कणेर, ता. वसई येथील अनुक्रमे फेरफार क्र. ५७ व १०९५, दिनांक २८.०३.२००२ अन्वये सखाराम जिव्या वरठा यांचेसह सहहिस्सेदार म्हणुन सुरेश रत्नाकर मराड व इतर यांचे सामाईक नांवे दाखल होती. सदर फेरफारास व्यथित होवून श्री. दत्तात्रेय सदानंद देसाई यांनी तत्कालीन उप विभागीय अधिकारी, भिवंडी यांचेकडे अपील दाखल केले होते. सदर अपिलाच्या अनुषंगाने तत्कालीन उप विभागीय अधिकारी, भिवंडी यांनी दिनांक ३०.१०.२००९ रोजी आदेश पारीत करून फेरफार क्र. ५७ व १०९५ रद्द केले आहेत. तसेच वादातील मिळकतीचे कूळ म्हणून श्री. सखाराम जिव्या वरठा यांचे नावाची नोंद इतर हक्क सदरी घेण्याचे नमूद केले होते. तथापि, गाव दप्तरी अंमल घेण्यात आलेला नव्हता.

अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा), राज्य स्तरीय आदिवासी क्षेत्र आढावा समिती, महाराष्ट्र शासन यांनी जिल्हाधिकारी, पालघर यांना दिनांक ३०.०४.२०२२, दिनांक १६.०९.२०२२ व दिनांक ०५.१२.२०२२ रोजी निवेदन दिले असून सदर निवेदनाच्या अनुषंगाने उप विभागीय अधिकारी, वसई यांना आवश्यक कार्यवाही करणेबाबत कळविले होते.

त्यानुसार उप विभागीय अधिकारी, भिवंडी यांच्या दिनांक ३०.१०.२००९ रोजीच्या आदेशाचा अंमल घेण्यात येऊन मौजे कणेर येथील स. नं.३०, ३३/४, ४० व ४४ तसेच मौजे खैरपाडा येथील स. नं. ६९ मध्ये दाखल असलेले सह हिस्सेदार व त्यांचे वारसांची नावे कमी करून श्री. सखाराम जिव्या वरठा यांचे नाव अनुक्रमे फेरफार क्र. १३६७ व ७६४, दिनांक २२.०२.२०२३ अन्वये पूर्ववत करण्यात आली आहेत. वारस चौकशी करून उचित कार्यवाही करण्याचे संकल्पित आहे.

-----------------

**विधान भवन**
**मुंबई**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.